# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०८/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## ग्रामपंचायत बेलोना येथे जळीत प्रकरणात मर्ग दाखल

पोलीस स्टेशन नरखेड हददीतील ग्रामपंचायत बेलोना ता नरखेड येथील शासकीय जमीनीवर सर्वे नं. २३० वर अतीक्रमण धारक १) अरविंद रमेश बांबल वय ३८ वर्ष २) लक्ष्मण मारोतराव बोडके वय ६५ वर्ष ३) नरेन्द्र बाबुराव डाखोळे वय ६५ वर्ष यांना अतिक्रमण काढणे करीता दि. २३/०२/२०२३, दि. १३/०३/२०२३, दि. ०३/०४/२०२३ ग्रामपंचायत बेलोना यांनी नोटीस दिलेल्या आहेत. सदर अतिक्रमण जागेवर अहिल्याबाई होळकर सभागृह शासकीय अनुदानातुन बांधकामाकरीता १० लक्ष रू. चा निधी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडून विधानपरिषद सदस्य आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मंजुर झालेला आहे. सदरचे काम कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हापरिषद नागपूर यांचेमार्फतीने प्रस्तावित आहे.

दि. १३/०२/२०२४ रोजी ग्रामपंचायत बेलोना ता. नरखेड यांनी तहसीलदार नरखेड यांना सदर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण काढण्याकरीता पत्र दिलेले होते. दि. २१/०६/२०२४ रोजी तहसीलदार नरखेड यांनी सरपंच/ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत बेलोना, ता. नरखेड यांना सर्वे क्र २३०, मौजा बेलोना, येथील अतिक्रमणा संदर्भात पत्र दिले. महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचा शासन परीपत्रक क्र. जमिन–०७/२०१३ /प्र.क. ३७४/ज–१ दि. १०/१०/२०१३, चे शासन परिपत्रकानुसार गायरान व सार्वजनिक जमिनींच्या बाबतीत संबंधीत जागेवरील अतिक्रमण काढण्याची जबाबदार ही सबंधीत गावचे ग्रामसेवक असल्याने मौजा बेलोना येथील सर्वे क्र. २३० वरील अतिक्रमण काढण्याबाबत आपले स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी असे तहसीलदार, नरखेड यांचे पत्रामध्ये नमुद आहे. ग्रामपंचायत बेलोना यांनी अतिक्रमण काढणेकरीता आकार तत्वावर पोलीस संरक्षण बंदोबस्त मिळणेकरीता मागणी केली होती. ग्रामपंचायत बेलोना यांची आकार तत्वावर पोलीस संरक्षणाची मागणी अर्जाची पो.स्टे नरखेड कडुन चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, अतिक्रमण धारक १) अरविंद रमेश बांबल २) लक्ष्मण मारोतराव बांडके ३) नरेश बाबुराव डाखोळे सर्व रा. बेलांना यांचे जबाब नोंदविण्यात आले. सदर अर्जाचे चौकशी अंती पोलीस स्टेशन नरखेड येथुन ०१ पोलीस अधिकारी, ०२ पोलीस अंमलदार व ०१ महिला अंमलदार यांचा बंदोबस्त दि. ३१/०७/२०२४ रोजी ग्राम बंदोबस्त येथे अतिक्रमण बंदोबस्त पुरविण्यात आला होता.

दि. ३१/०७/२०२४ रोजी पोलीस बंदोबस्त, ग्रामसेवक व ग्रामपंचायतचे पदाधिकारी सरपंच व उपसरपंच, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस पाटील, हे शासकीय जमिन सर्वे २३० मौजा बेलोना येथे हजर असतांना अतिक्रमण हटविण्याचे कामकाज सुरू होण्यापुर्वीच अतिक्रमण धारक अरविंद रमेश बांबल वय ३८ वर्ष रा. बेलांना हा आपल्या राहत्या घराकडुन पाठीवर जळत्या अवस्थेत धावत येवुन त्याच्या कोठयासमोर झोपला. गावातील नागरीकांनी पाणी टाकुन आग विझवीली व दिनेश बांबल रा. बेलोना याने वाकळ आणुन आग विझवीली. बंदोबस्त वरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अरविंद बांबल यास पोलीस वाहनामध्ये उपचाराकरीता तात्काळ ग्रामीण रूग्णालय नरखेड येथे आणले. त्या दरम्यान पोलीस यांनी १०८ रूग्णवाहीकेस संपर्क केला व तेथुन १०८ रूग्णवाहिकेत पुढील उपचाराकरीता नागपुर मेडीकल कॉलेज नागपुर येथे दाखल केले. सदर घटनेचे मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉडींग पोलीसांचे मार्फतीने करण्यात आले. सदर व्हिडीओ रेकॉडींगमध्ये मयत अरविंद बांबल, वय ३८ वर्ष, रा. बेलोना हे स्वत:च्या घराकडुन कोठयाकडे पाठीवर जळालेल्या अवस्थेत पळत येतांना दिसत आहे व नागरीकांनी त्याला विझविले

असे दिसत आहे. दि. ०७/०८/२०२४ रोजी अरविंद रमेश बांबल वय ३८ वर्ष रा. बेलोना यांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. पोलीस स्टेशन नरखेड येथे मर्ग क्र. ३३/२०२४ कलम १९४ बि.एन.एस.एस. दि. ०९/०८/२०२४ रोजी दाखल असून नरखेड पोलीस पुढील तपास करीत आहे.

## केळवद पोलीस स्टेशन अंर्तगत अवैध्यरीत्या सुगंधीत तंबाखु वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ११/०८/२०२४ चे १२.३० वाजता दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल राउत ठाणेदार पोलीस स्टेशन केळवद व त्यांच्या पोलीस स्टॉपनि मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन छिंदवाडा कडुन नागपुरकडे जाणा—या हायवेवरील शिव लॉन केळवद येथे नाकाबंदी करुन नाकाबंदी दरम्यान पांढ—या रंगाची कार क्र. टाटा अॅल्वी क्र एम एच २७/डी ए—६३२१ किंमती ५,००,०००/—रू. व कारमध्ये पांढऱ्या, पिवळया रंगाच्या ३१ प्लास्टीक बोऱ्या मध्ये क्र १) पान मसाला राजश्रीचे ४८ पॅकेट वजन प्रत्येकी १७२.५ ग्रॅम किंमती १२,९६०/—रू. २) सुगंधीत तंबाखु गोल्ड सफारी एकुण ४० पॉकेट प्रति पैकेट ०१ किलो ग्राम वजनाचे एकुन प्रत्येकी किंमती ५५०/—रू. प्रति पॅकेट असा एकुन किंमती २२,०००/— रुपये ३) पाण मसाला विमल ४० पॅकेट किंमती ७९२०/—रू. ४) सुगंधी तंबाखु जणम ५३५ चे २०० पॅकेट एकुण किंमती ५०,०००/— ५) पान मसाला राजश्री एकुण १०० पॅकेट ३४,०००/—रू ६) सुगंधीत तंबाखु रिमझीम ८० पॅकेट ४४,०००/— रू ७) सुगंधीत तंबाखु गोल्डण युग १२० पॅकेट किंमती २३,४००/—रू. ८) पान मसाला सागर २४० नग किंमती ३४,५६०/—रू. असा एकुन किंमती २,२८,८४०/—रुपयाचा मुद्देमाल हा सुंगधीत तंबाखु यांचे सेवनाने मानवी जिवीतास अपायकारक, हानीकारक व घातक ठरत असल्याने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात सुगंधीत तंबाखू यांचे उत्पादन, साठा, वितरण, विक्रीस, वाहतूकीस निर्बंध घातलेला आहे. हे आरोपीला माहीत असतानाही यातील आरोपीने स्व:ताचे आर्थिक फायदयाकरीता जाणीवपुर्वक विक्री करीता अवैधरित्या वाहतूक करताना मिळून आल्याने नमुद **आरोपी मितेश सुनील सोमकुवर वय २४ वर्ष रा. वकिल पेठ रेशिमबाग नागपुर** यांचेवर कलम १२३, २२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता सहकलम ५९, २६(१), २६(२) (iv), २७ (३) (e), ३० (२) (a) अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा सखोल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामिण श्री. रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे केळवद येथील ठाणेदार स.पो.नि अनिल राउत, पोहवा सुधीर यादगिरे, पोहवा मंगेश धारपुरे, पोशि अर्णव भांगे, चालक गुणेश्वर डाखोळे यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर